**(इंग्रजीत टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**१९९६-१- एस. सी. आर. - ३८७**

**श्रीमती अफसर जहाँ बेगम आणि इतर**

**वि.**

**मध्य प्रदेश राज्य आणि इतर**

**जानेवारी ११, १९९६**

**[न्या. के. रामास्वामी आणि न्या. जी. बी.पटनायक,]**

मोटार वाहन अधिनियम , १९८८ :

कलम १०२(२)—मंजूर योजना-चे फेरबदल - राष्ट्रीयीकृत मार्गांवर खासगी चालकांना काही अटी व निर्बंधांनुसार केवळ २५ किलोमीटर अंतरापर्यंतच शिथिलता देणे-अधिसूचित क्षेत्राला छेद देणाऱ्या कोणत्याही मार्गावरील चालकाला निर्बंधक मार्गिका क्षेत्राला धरून काटेकोरपणे वाहन चालविणे -सार्वजनिक हिताची पूर्तता करण्यासाठी आणि मंजूर योजना नष्ट न करण्यासाठी शिथिलता.

आदर्श ट्रॅव्हल्स बस सेवा विरुद्ध उ. प्र. राज्य आणि इतर ,[१९८५] ४ एससीसी ५५७, यावर अवलंबून होते.

दिवाणी मूळ अधिकारिता : रिट याचिका (सी) क्रमांक ८४७५/१९८१ इत्यादी,

(भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२ अन्वये.)

एस. के. गंबीर, ए. के. पांडे, आर. पी. सिंह, एच. के. पुरी, बी. एस. बांठिया, एस. के. अग्निहोत्री, ए. के. सिंघी (एन.पी.), टी. सी. शर्मा (एनपी), राजिंदर नारायण अँड कंपनी.

-उपस्थित राहण्याऱ्या पक्षकारांकरिता.

न्यायालयाने पारित केलेला आदेश खालीलप्रमाणे आहे :

पक्षकार दाखल करण्यास मंजुरी.

रि. या. क्रमांक ८३३०/८१ मध्ये बदली पक्षकार दाखल करण्यास मंजुरी.

या सर्व रिट याचिका आणि अपील सामायिक न्यायनिर्णयाद्वारे निकाली काढण्यात येत आहेत कारण या प्रकरणांमध्ये निर्णयासाठी कायद्याचा सामान्य प्रश्न निर्माण होतो.

हे मान्य आहे की, याचिकाकर्ते / अपीलकर्ते ज्या मार्गांवर आपली वाहने छेदण्याचा आणि चालविण्याचा प्रयत्न करीत आहेत ते अधिसूचित मार्ग आहेत. अधिसूचित मार्ग अधिनियम ४, १९३९ च्या प्रकरण ४-ए अंतर्गत प्रकाशित केले गेले आणि अंतिम झाले. मोटार वाहन अधिनियम, १९८८ मध्ये राज्य परिवहन उपक्रमांशी संबंधित विशेष तरतूद म्हणून प्रकरण ६ सादर करण्यात आले. कलम ९९ राज्य परिवहन उपक्रमाच्या मार्ग परिवहन सेवा

संबंधीचा प्रस्ताव तयार करण्यास आणि प्रसिद्ध करण्यास प्राधिकृत करत. कलम १०२ योजना रद्द करणे किंवा त्यात फेरबदल करणेशी संबंधित आहे. त्यात अशी तरतूद आहे की, लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे राज्य शासनाला वाटत असल्यास, राज्य शासन कोणत्याही वेळी - (एक) राज्य परिवहन उपक्रम; आणि (दोन)राज्य शासनाच्या मते जिच्यावर प्रस्तावांतील बदलामुळे परिणाम होण्याची शक्यता आहे अशी कोणतीही इतर व्यक्ती, यांना प्रस्तावित बदलाच्या बाबतीत त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, कोणत्याही मान्य योजनेत बदल करू शकेल.

उपकलम (२) अन्वये राज्य शासन, पोटकलम (१) खालील कोणताही प्रस्तावित फेरबदल शासकीय राजपत्रात आणि अशा फेरबदलाद्वारे व्याप्तीत आणण्याचे प्रस्तावित आहे अशा क्षेत्रात प्रसूत होण्याच्या प्रादेशिक भाषेतील वर्तमानपत्रांपैकी एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध करील आणि त्यात त्याबाबतीत आलेल्या कोणत्याही अभिवेदनाची सुनावणी राज्य शासन, ज्या तारखेला करील ती, असा बदल शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून तीस दिवसांपेक्षा अगोदरची नसेल अशी तारीख ज्यावेळी व ज्या ठिकाणी ही सुनावणी केली जाईल ती वेळ व ते ठिकाण प्रसिद्ध करेल .

अपीले प्रलंबित असताना, मंजूर योजनांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार केल्याचे आमच्या निदर्शनास आणून दिल्यावर, दिनांक १.११.१९९५ च्या आमच्या आदेशाद्वारे आम्ही असा आदेश दिला कि, राज्याच्या वतीने उपस्थित विद्वान

वकिलांनी अधिनियमाच्या कलम १०२ (२) अन्वये आवश्यकतेनुसार मसुदा दुरुस्ती मंजूर करून प्रकाशित केली आहे की नाही याची पडताळणी करून न्यायालयासमोर सादर करावे व मंजूर योजनांमध्ये सुधारणा करणे व त्यावर केलेली कार्यवाही सादर करणे आवश्यक आहे. याबाबत सक्षम व जबाबदार अधिकाऱ्याद्वारे प्रतिज्ञापत्र सादर करावे. त्याअनुषंगाने इंदूरचे आर.टी.ओ. के.के. तिवारी यांनी अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यात म्हटले आहे की, सरकारने २१.२.१९९१ च्या अधिसूचनेद्वारे काही अटी व निर्बंधांखाली खासगी चालकांना राष्ट्रीयीकृत मार्गावर केवळ २५ किलोमीटर च्या अंतरापर्यंत शिथिलता दिली आहे. सुधारित योजनेअंतर्गत आणि अधिनियमाच्या कलम १०२ (२) अन्वये देण्यात आलेल्या शिथिलतेनुसार आता देण्यात आलेल्या मार्गिका क्षेत्राचा लाभ अपीलकर्त्यांना मिळणार नाही. त्यामुळे याचिकाकर्ता शिथिलतेच्या लाभासाठी दावा करू शकत नाही. त्यांनी अधिसूचनेत असे म्हटले आहे की ;

“आणि, ज्याअर्थी, परिवहन सेवेची अतिरिक्त मागणी लक्षात घेता राज्य शासनाने सार्वजनिक हिताच्या दृष्टीने खाजगी चालकांना या योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या मार्गांवर भाड्याने किंवा वैयक्तिक प्रवाशांकडून भाडे घेऊन भाडेतत्वावर वाहन चालविण्यास परवानगी देणे आवश्यक मानले आहे आणि त्या उद्देशाने खालील अनुसूचीत दर्शविल्याप्रमाणे या सर्व योजनांमध्ये सुधारणा करण्याची इच्छा आहे:

<u>अनुसूची</u>

त्या प्रत्येक योजनेत खालील शब्द, आकडे व कंस शेवटी जोडले जातील,म्हणजे :

"या योजनेत काहीही अंतर्भूत असले तरी खाजगी चालकांना खालील अटींच्या अधीन राहून भाड्याने किंवा वैयक्तिक प्रवाशाकडून भाडे घेण्याच्या तत्वावर चालविण्याची परवानगी दिली जाऊ शकते, म्हणजे-

(१) अधिसूचित मार्गावरील शिथिलतेची मर्यादा २५ किलोमीटरपेक्षा जास्त नसावी.

(२) खाजगी चालक हे, अधिसूचित प्रवासमार्गाच्या अंतराशिवाय जे दुपटीपेक्षा कमी असणार नसेल अशा तर्हेने भाडेतत्वाचे वाहन चालवतील, अधिरसूचित प्रवासमार्ग अंतर परवान्यामध्ये अंतर्भूत असेल .

(३) अधिसूचित प्रवासमार्गावरील २५ किलोमीटर्स संबंधी सुटीच्या मर्यादेची गणना, एकूण अंतराच्या आधारावर असेल.

(४) जरी या योजना १९७९ नंतर कार्यान्वयीत झाल्या असल्या तरी ही सवलत सर्व योजनांतर्गत अधिसूचित मार्गांना लागू असेल.

(५) खाजगी चालक अधिसूचित मार्गावर प्रवासी उचलू किंवा खाली उतरवू शकत नाहीत.

अदारश ट्रॅव्हल्स बस सर्व्हिस वि.यु. पी. राज्य आणि इतर, (१९८५) ४ एस. सी. सी. ५५७ या प्रकरणात  या न्यायालयाच्या घटनापीठाने कलम ६८-सी, ६८-डी (३) आणि ६८-

एफएफ आणि अधिनियम ४, १९३९ च्या कलम २ (२८-ए) चा विचार केला आणि असे मत व्यक्त केले होते की :

कलम ६८-ड अन्वये एखाद्या क्षेत्रासंबंधी किंवा मार्गासंदर्भात किंवा भागासंदर्भात एखादी योजना प्रकाशित झाल्यानंतर, मग ती इतर व्यक्तींना वगळणे, पूर्ण किंवा अर्धवट किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला वगळणे असो, राज्य परिवहन व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला, योजनेतील तरतुदी वगळता, अधिसूचित क्षेत्रावर किंवा अधिसूचित मार्गावर वाहन चालवू शकता येणार नाही. या तरतुदींचा एक आवश्यक परिणाम असा आहे की योजनेच्या अटींनुसारच अधिकृत केल्याशिवाय कोणतेही खाजगी चालक अधिसूचित क्षेत्र किंवा अधिसूचित मार्गाच्या कोणत्याही भागावर किंवा हिस्स्यावर आपले वाहन चालवू शकत नाही. तो त्याला दिलेल्या परवान्यामध्ये अधिसूचित मार्ग किंवा क्षेत्राचा समावेश आहे केवळ या आधारावर अधिसूचित मार्गाच्या किंवा क्षेत्राच्या कोणत्याही भागावर किंवा हिस्स्यावर वाहन चालवू शकत नाही.

प्रकरणाच्या या दृष्टीने, गोठवलेल्या अधिसूचित मार्गातून किंवा क्षेत्रातून योजनेतून योजनेतच  तरतूद केल्याप्रमाणे, ही एकच शिथिलता देण्यात आली आहे.  अधिसूचित मार्गाला छेद देणाऱ्या कोणत्याही मार्गावरील प्रत्येक चालकाने आवश्यकतेनुसार निर्बंधक मार्गिका क्षेत्राला धरून वाहन चालविणे आवश्यक आहे आणि यापुढे नाही. शिथिलता मंजूर योजना नष्ट करण्यासाठी  नाही तर  सार्वजनिक हिताच्या उपयोगासाठी आहे.

ज्येष्ठ वकील गंभीर यांनी असा युक्तिवाद केला की अधिनियमाच्या कलम १०२ (२) अन्वये सुधारित व अधिसूचित केल्याप्रमाणे योजनेत २५ किलोमीटर पर्यंत शिथिलता देण्याची तरतूद केल्याच्या दृष्टीकोनातून सर्व याचिकाकर्ते त्यातील अटींनुसार चालविण्यास हक्कदार आहेत. या रिट याचिकांमध्ये आम्ही याचिकाकर्त्यांना कोणतेही निर्देश किंवा दिलासा देऊ शकत नाही. असे दिसून येते कि, शासनाने मार्गांना मंजुरी दिल्याने, अधिनियमाच्या कलम १०२ (२) अन्वये अधिकाराचा वापर करून मंजूर मार्गांना केवळ २५ किलोमीटर अंतरापर्यंत छेद देऊन अधिसूचित मार्गावरील प्रवाशांना न घेता किंवा खाली न उतरवता , त्यात नमूद केलेल्या अटी आणि शर्तींच्या काटेकोरपणे अधीन राहून लाभ देण्यात आला आहे. त्या परिस्थितीत याचिकाकर्त्यांना कोणताही दिलासा देता येणार नाही. परंतु सुधारित योजनेअंतर्गत त्यांना काही अधिकार असतील, तर राज्य परिवहन उपक्रम व इतर सर्व हितसंबंधित व्यक्तींना योग्य ती सूचना दिल्यानंतर प्रादेशिक परीवहन प्राधिकरण किंवा राज्य परिवहन प्राधिकरणाने त्यात लक्ष घालणे योग्य ठरेल.

त्यानुसार रिट याचिका फेटाळल्या जातात. परिणामी, अपील देखील फेटाळले जाते.

खर्चाबाबत आदेश नाही.

जी.एन. याचिका फेटाळल्या

**x-x-x-x**

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**